# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ३०/११/२०२५ ( रविवार )**

---

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणा—या आरोपीतांविरूध्द ५ गुन्हे नोंद ,कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २९/११/२०२५ रोजी **पो.स्टे. कळमेश्वर** येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण ५ गुन्हे नोंद करण्यात आले. कळमेश्वर पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून मौजा लोहगड शिवार आणि मौजा गांडखैरी येथे धाड टाकुन अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्या एकुण ०५ महिला आरोपीचे ताब्यातुन एकुण ६५५ लिटर मोहाफुल दारू आणि ८४०० लिटर मोहाफुल सडवा प्लास्टीक ड्रम,लोखंडी ड्रम आणि इतर साहीत्या **असा एकुण ३,७६,६००/— रुपयाचा मुददेमाल जप्त केला.** नाशवंत मुद्देमाल मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन नाश करण्यात आला आहे. ०५ महिला आरोपी यांचे विरुध्द पोस्टे कळमेश्वर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणा—या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद ,केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २९/११/२०२५ रोजी केळवद पोलीसांना अवैध्यरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्यांबाबत गोपनिय माहीती गोपनिय माहीतीवरून अवैधरित्या मौजा छत्रापुर येथे आरोपी मुकेश धुर्वेसिंग मारवाडी वय ४० वर्ष, आणि एक महीला आरोपी रा. दोन्ही छत्रापुर (पारधीबेडा) जि. नागपुर यांचे करावाई करत २३,३५०/— रूपयाचां मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपी १) जगतपाल मारवाडी २) महीपाल मारवाडी रा.दोन्ही तिंडगी

(पारधीबेडा) जि. नागपुर यांचे वर  कारवाई करत ३२,१००/— रूपयाचां मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाईत  १) २५ लीटर मोहाफुल दारू ,२) १२०० किलो मोहाफुल रसायन सडवा ,प्लॉस्टिक आणि लोखंडी ड्रम आणि इतर साहित्य असा एकुण असा एकुण ५५,४५०/— रुपयाचा मुददेमाल मिळुन आल्याने मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन नाश करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २ गुन्हें नोंदविण्यात आले  आहे.



## पोलीस ठाणे उमरेड हद्दीतील मौजा गरडेपार पारधीबेडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २९/११/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा गरडेपार पारधीबेडा येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी नमुद ठिकाणी

जावुन धाड टाकुन **आरोपी नामे मोरधन राजेराम राजपुत, रा. गरडेपार पारधीबेडा** याचेवर कारवाई करत घटनास्थळावरून १) १५ लीटर मोहाफुल दारू कीमंती ७५०/— रूपये २) ३४०० किलो मोहाफुल रसायन सडवा किंमती १२००००/— रूपये ३) १७ प्लॉस्टीक ड्रम किंमती १८०००/— रूपये आणि हातभट्टीचे इतर साहीत्य असा **एकुण किमंती १,३९,१३०/—रूपयांचा मुद्देमाल** मिळुन आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.





## आगामी निवडणुक दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत काढण्यात आला रूट मार्च

आगामी नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५ असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत नमुद निवडणुक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक ३०/११/२०२५ पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत रूटमार्च काढण्यात आला. सदर रूट मार्च पोलीस स्टेशन उमरेड ते भिसी नाका चौक ते इतवारी मार्केट ते जीवन विकास चौक ते पोलीस स्टेशन उमरेड पर्यत या मार्गाने घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये पोलीस निरीक्षक

श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांच्यासह पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीस अधिकारी, अंमलदार , दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार , गृहरक्षक हजर होते.




पोलीस

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री,वाहतुक तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३० गुन्हे नोंद. ८ लाख ८५ हजार २८० रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २९/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू, सडवा तसेच इतर साहीत्य असा **एकुण ८,८५,२८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे नोंद आहे.पोलीस स्टेशन कन्हान येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन मौदा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापूर येथे १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे १ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन बोरी येथे १ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन केळवद येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ०६ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे ६ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे ४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवनी येथे १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ३० नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १९९८० मिली देशी दारू, २९९० लीटर मोहाफुल दारू, १४२०० लिटर सडवा, ५४० मिली विदेशी दारू तसेच इतर साहीत्य असा एकुण ८,८५,२८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने